# अक्षय तृतीया : परंपरा, आठवणी आणि कष्टांचा प्रवास



अक्षय तृतीया जवळ येत होती. एप्रिल १९७७ चा तो काळ होता. माझं वय साधारण आठ-नऊ वर्षांचं. एके सकाळी आईने अचानक सांगितलं की आज आपल्याला खामखेडे येथे जावं लागेल. कारण गावात आलेल्या कुंभाराकडे अक्षय तृतीयेच्या घागरी होत्या, पण “डेरग” उपलब्ध नव्हतं. त्या वेळी मला “डेरग” म्हणजे काय, याची कल्पनाच नव्हती. आईने समजावलं की अक्षय तृतीया हा पितरांचा दिवस मानला जातो. ज्या घरात नुकतंच वडीलधाऱ्यांचं निधन झालेलं असतं, त्या वर्षी “डेरग” भरून पूजा केली जाते. आमच्या वडिलांचं निधन काही महिन्यांपूर्वीच झालं होतं, त्यामुळे यंदा त्यांचा पहिला पितर “डेरग” भरून करायचा होता. ते ऐकून मला त्याचं महत्त्व कळलं. आईने मला खिशात एक-दोन रुपये दिले. त्या काळात ही रक्कम आमच्यासाठी खूप मोठी होती. आईने कष्टाने ते पैसे जमवले होते. आम्ही दोघं खामखेडेकडे निघालो. चालता चालता मी वारंवार खिशाला हात लावून पैसे आहेत की नाही हे तपासत होतो. कुंभाराच्या घरी पोहोचलो, पण दुर्दैवाने त्याच्याकडे डेरग नव्हतं. त्यामुळे आम्ही निराश होऊन परत फिरलो. तिथल्या कुंभाराने सांगितलं की कदाचित सोनवद येथे डेरग मिळेल. आशेचा किरण दिसला, पण दुपार झाली होती. तीव्र उन्हात अनवाणी चालणं कठीण होतं, कारण आमच्याकडे चप्पल नव्हत्या. आम्ही काही वेळ नातेवाईकांकडे थांबलो आणि दुसऱ्या दिवशी लवकर निघण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सोनवदच्या दिशेने निघालो. आईने भाकर आणि तिखट बांधून घेतलं होतं. तीन-चार तास चालत आम्ही कुंभारवाड्यात पोहोचलो. तिथे डेरग पाहून आईच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. तिने लगेच ते घेतलं आणि आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. परतीचा प्रवास मात्र अधिक कठीण होता. उन्हाची तीव्रता वाढली होती. गरम जमिनीमुळे पाय जळत होते. तरीही आई मला सतत सांगत होती की डेरग नीट सांभाळ, कारण ते मातीचं असल्याने पडल्यास फुटेल. आमची मेहनत वाया जाईल. झुरखेड्याजवळ नदीच्या पाण्याने थोडा दिलासा मिळाला. झाडाच्या सावलीत बसून आम्ही भाकर खाल्ली आणि थोडा वेळ विश्रांती घेतली. संध्याकाळी शेवटी आम्ही घरी पोहोचलो. दोन दिवसांच्या कष्टानंतर डेरग सुरक्षितपणे घरी आणण्यात यश आलं. गावात अक्षय तृतीयेची तयारी सुरू झाली होती. आईने वडिलांच्या पहिल्या पितरासाठी विशेष तयारी केली. सांजोरी, घुण्या, पापड्या, शेवया असे पदार्थ बनवले. त्या दिवशी पूर्वज पितर रूपाने घरी येतात, असा समज असल्याने आई अत्यंत श्रद्धेने सर्व तयारी करत होती. अक्षय तृतीयेच्या दिवशी आईने घर स्वच्छ करून, शेणाने सारवून, चुलीला मातीने पोतारून स्वयंपाक केला. मी विहिरीवरून पाणी आणलं. डेरग आणि लोटा गव्हाच्या दाण्यांवर ठेवून पूजा करण्यात आली. नैवेद्य अर्पण करून पितरांना स्मरण करण्यात आलं. त्या दिवशी मला विशेष आनंद झाला. कारण वडील प्रत्यक्ष नसले तरी पितर रूपाने घरी येणार, अशी भावना मनात होती. त्यांच्या शेवटच्या भेटीची आठवणही नव्हती, त्यामुळे हा दिवस अधिक भावनिक होता.

आजही पन्नास वर्षांनंतर मी ही परंपरा तितक्याच श्रद्धेने पाळतो. अक्षय तृतीयेपूर्वी आंब्याचा रस न खाणे आणि श्राद्धानंतरच तो घेणे, ही परंपरा अजूनही जपली आहे. या सणातून आपल्या पूर्वजांबद्दलचा आदर आणि संस्कारांची परंपरा दिसून येते.

**लेखक -भिला सोनू पाटील**

(जल अभ्यासक व केंद्र सरकार जलप्रहरी पुरस्कार प्राप्त जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार)




























# अहिल्यानगर... ऐतिहासिक वारसा ते आधुनिक महानगराकडे 'संग्राम' झेप

**अहिल्यानगर शहर हे केवळ महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकाणचे शहर नाही, तर ते राज्याच्या राजकारणाचे आणि समाजकारणाचे केंद्र राहिले आहे. १५ व्या शतकात निजामशाहीची राजधानी असलेल्या या शहराने स्वातंत्र्यानंतर अनेक चढ-उतार पाहिले. ऐतिहासिक कोट-किल्ला आणि लष्करी छावणी ही शहराची ओळख राहिली, मात्र नागरी विकासाच्या बाबतीत अनेक दशके हे शहर मूलभूत सुविधांच्या प्रतीक्षेत होते.**



स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही दशकांत अहिल्यानगरची ओळख 'पेन्शनर्स सिटी' किंवा लष्करी हालचालींचे केंद्र अशी होती. शहराचा विस्तार होत असला तरी तो नियोजनबद्ध नव्हता. पाणीटंचाई, अरुंद रस्ते आणि एमआयडीसीचा संथ विकास ही प्रमुख आव्हाने होती. वाढती लोकसंख्या आणि जुन्या शहराच्या मर्यादा यामध्ये ताळमेळ साधताना प्रशासनास अडचणींचा सामना करावा लागत होता.या पार्श्वभूमीवर शहराच्या विकासाला गती मिळाली ती आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली. शहराची सखोल माहिती असलेल्या त्यांच्या नेतृत्वाने केवळ भौतिक सुविधा वाढवण्यावर भर न देता, नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा आणि दीर्घकालीन नियोजनावर लक्ष केंद्रित केले.गेल्या काही वर्षांत शहरात झालेल्या बदलांमध्ये वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा विशेषत्वाने दिसून येते. सक्कर चौक ते कोठी आणि इतर प्रमुख मार्गांवर उड्डाणपूल उभारणीमुळे वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पाणीपुरवठा योजनांचे आधुनिकीकरण करून 'अमृत' योजनेद्वारे शेवटच्या घटकापर्यंत पाणी पोहोचवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.यासोबतच रस्त्यांचे रुंदीकरण, चौकांचे सुशोभीकरण आणि शहराच्या प्रवेशद्वारांपासून अंतर्गत भागापर्यंत आधुनिकतेचा स्पर्श देण्यात आला आहे. सिव्हिल हॉस्पिटलचे आधुनिकीकरण आणि शैक्षणिक संस्थांना मिळालेल्या प्रोत्साहनामुळे अहिल्यानगर आरोग्य व शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे केंद्र बनत आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव जिल्ह्याला मिळाल्यानंतर शहराच्या विकासाबाबत अपेक्षा अधिक वाढल्या आहेत. भविष्यात एमआयडीसी क्षेत्रात गुंतवणूक वाढवून रोजगारनिर्मितीला चालना देण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच पुण्याच्या जवळीकाचा लाभ घेत आयटी पार्क उभारण्याच्या हालचालीही सुरू आहेत.अहिल्यानगर आज केवळ जिल्ह्याचे मुख्यालय राहिले नसून, ते भविष्यातील महानगर म्हणून आकार घेत आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत सर्वांगीण विकासाची दिशा देणारे नेतृत्व शहराला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## संघटन कौशल्य व विकासदृष्टीमुळे श्री. अरुण मुंढे यांचे नेतृत्व ठळक



शेवगाव तालुक्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे नेतृत्व म्हणून श्री. अरुण भाऊसाहेब मुंढे यांचे नाव आज अग्रक्रमाने घेतले जाते. संघटन कौशल्य, युवकांना जोडण्याची क्षमता आणि विकासाची ठोस दृष्टी या बळावर त्यांनी स्थानिक ते राज्यस्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सामाजिक व क्रीडा क्षेत्रात कार्य करताना त्यांनी १९९८ साली "वंदे मातरम् क्रीडा मंडळ" स्थापन करून ग्रामीण भागातील युवकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. स्वतः कबड्डी खेळाडू असल्याने त्यांनी युवकांमध्ये शिस्त, व्यायाम व स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करण्यावर भर दिला. विविध आरोग्य शिबिरे, युवक मेळावे व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजकार्याचा ठसा उमटवला आहे.

राजकीय कारकिर्दीत त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या विविध पदांवर काम करत संघटना मजबूत केली. युवा मोर्चा तालुका अध्यक्ष, शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस अशा जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण केला. सध्या ते महाराष्ट्र प्रदेश सचिव म्हणून कार्यरत असून राज्यस्तरावरही सक्रिय भूमिका बजावत आहेत.

निवडणूक क्षेत्रातही त्यांचा अनुभव लक्षणीय आहे. शेवगाव नगरपरिषदेत नगरसेवक म्हणून काम करताना त्यांनी पाणीपुरवठा, रस्ते व स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केले. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचे नाव सर्वेक्षणातून पुढे आले, हे त्यांच्या वाढत्या जनाधाराचे द्योतक मानले जाते.

याशिवाय, शेवगाव तालुक्यातील सोनेसांगवी येथे प्रस्तावित पिंगळा सहकारी सूतगिरणी प्रकल्पामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. हा प्रकल्प त्यांच्या विकासाभिमुख विचारांचा प्रत्यय देणारा ठरतो.

दरम्यान, २०२६ च्या नगरपरिषद निवडणुकीत त्यांच्या पत्नी सौ. माया अरुण मुंढे या नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या असून, त्यांच्या कुटुंबीयांच्या नेतृत्वावर जनतेचा वाढता विश्वास स्पष्ट होत आहे.

एकंदरीत, संघटनबळ, प्रामाणिक कार्यपद्धती आणि विकासाची स्पष्ट दिशा या गुणांच्या जोरावर श्री. अरुण मुंढे यांचे नेतृत्व भविष्यात अधिक प्रभावी ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.


शब्दांकन– **सुरेश पाटील**, शेवगाव



















पुरवणी संकलन : प्रविण खोमणे, (एरंडगाव), दादासाहेब डोंगरे (शेवगाव), नंदकुमार कुरूमकर (लिंपणगाव), अर्जुन राऊत (टाकळीभान), दत्ता गाडगे (पारनेर), अशोक दुशिंग (शिर्डी)



# वर्षभर जत्रेची मांदियाळी शिर्डीची साईनगरी





**अशोक दुशिंग**
संग्रह
शिर्डी कार्यालय प्रमुख

**शिर्ड साईनगरीत अनेक मोठमोठे उत्सव साजरा केले जातात. साईबाबांच्या पुण्य ही नगरी लाभर जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. साईबाबा संस्थान व गावकरी यांच्या गुरुपहिमा, रामनवमी, दिवाळी दसरा, पाडवा, आषाढी एकादशी अनेक आबादी असे नाना वर्षभर पार पाडत असतात. आपण मांडणार आहोत.**

कोपरगावला गोपाळराव गुंड म्हणून एक सरकारी अधिकारी होते. तत् संतान नव्हेते. साईबाबांच्या प्रसादाने त्यांना पुत्ररत्न. ते बाबांचे निस्सीम भक्त बनले. एकदा गोपाळरावांच्या मृत्यू की, शिरडी व्यक्तव्हा वारावा यात्रा किंवा उरुस भरवा. तात्या कोते, रामचंद्र दादा कोते व माधवराव देशपांडे कर्मचारी पाटीलया मुख्यांचे त्यांचा विचार आवडला आणि ते तयारीलाही लागले. पण त्या करत जिल्हाधिका-यांची अनुमती अनुभव अनुभव होते. काही व्यक्तींचा विरोध जिल्हाधि मात्र यात्रा असे बाबांच्या भरले होते. आशीर्वादयुक्त त्यांची अनुमतीही होती. त्या मूळ गावक-वेही पिछा पुरविला. जिवापाड प्रयत्न केला आणि अधिका-द्वारे हुकूम फिरवून सगळयांचा मान राखला. तेव्हापासुन (शके १८१९, सन १८९७) बाबांच्या संमतीने श्रीरामनवमीच्या यात्रेच्या प्रथेला आरंभ. तात्या पाटील कोतेत्रेची व्यवस्था पाहु लागले. श्रीरामनवमीच्या भजन-पूजनाच्या समारंभास, ताशे-चौडे वाजंत्र्य दिवशी गौण यात्रेची शोभावृत्ती. राज्य यात्रेया निमित्ताने दोन नवी निशाणे समारंभपूर्व मिरवत आणून व्दारकामाईच्या कळसला बांधलीया बाहेर. मध्ये एक नानासाहेब निमोणकरांचे व वितरण नगर येथील दामूशेठ कासार (रासने) (ज्यांना बाबांच्या कृने पुत्ररनन होते.) ग्राहक होते. या उत्सवाचे आणखी एक वैशिष्ठ असंसंगत हिंदू-मुस्लीम ऐक्य सांगणारी संदल्ची मिरवणूक या उत्सवात निघते. बाबांचे भक्त अब्दुलबाबांच्या झोपडीपासून या मिरवणूकीला आरंभ होतो. या मिरवणूकीत सर्व धर्माचे साईभक्त भाग घेतात. शके १८३३ (सन १९११) साला श्रीरामनवमी प्रथम उरुसापोटी जन्माला आली आणि तेव्हापासून ही प्रथा अखंड चालू आहे. तोपर्यंत उरुसच मोठ्या प्रमाणात भरत असे. रामनमीची नालेक्ल्ना साभक्त कृष्ण जागवर भीष्मकात पूजा, भीष्म एकदा वाड्यात स्वस्थित्ताने बसले होते का महाजनी साहित्यासह मशिदीत जायला निघाले होते. उरुसात सहभागी होण्यासाठी कास्वासाठी एक दिवस उत्तम शिर्डीत हजर होते. भीष्मांनी त्यांना विचारले, "माया एक चांगला विचार आहे. मला मदत करा का? काका महाज हा विचार आवडला ते म्हणाले, "घ्या बाब्या होकार. त्यांच्या आज्ञेवर सर्व काही आहे. कामाला लागायला मला उशीर नाही. भीष्म म्हणाले, “कीर्तन करीन, तुम्हीचा सूर धरा. राधाकृष्णामाई पेटामी पेटवर सुंठवडा तयार करतील. मग बाबां, शुभाला विलंबला लावाल की अडचण उभ्यतो ममशिंदी असे राहते. त्यांनी पूजेला आरंभ करताच बाबांनी विचार केला, "वाड्यात काय चालले होते?" पण काकांना सांगणे सुचले नाही. तेव्हा बाबांनी तोच प्रश्न दुस-या तऱ्हेने भिष्मांना विचारला का हो! बुवा काय म्हणत होते?” तेंव्हा काकांना आठवण झाली आणि त्यांनी मनात योजलेला हेतू सांगितला. बाबांच्या मनाला तो विचार आवडला आणि उत्सव करण्याचे निश्चित झाले.

सौजन्य : श्री साईबाबा संस्थान शिर्डी

## बाबांनी हार नव्हे अनुमती दिली!

दुस-या दिवशी तुमच्या बाबा लेंडीला गेलेले समंडपात पालाणा बांधला आणि रामजन्माचं कीर्तन उभं राहिल. श्रोतेही बैंकेवर जमले त्याच बाबा परत. काका पेटीच्या साथीला बसले. इतक्यात बाबांनी त्यांना बोलवणे पाठविले. बाबा तुम्हाला बोलावित आहेत. हे शब्द एकीकरण काकांच्या पोटात धस्ड. म्हणाले, “कायद कळत नाही. कथेचा विरस न होवो कीर्तन निर्विघ्न पार म्हणजेन!” का चालत आणि मागे पाहत भीत द्वारकाईच्या पाय-या चढू लागले. काका फार चिंताग्रस्त होते. बाबा त्यांना विचारू लागले, “पाहा पाळणा येथे बांधला आहे?'' काकांनी कथेचे तात्पर्य व उत्सवाची योजना सांगितली आणि ती ऐकून बाबांनी आनंद घेतला. विचारल्यावर देश भीष्म बहुश्रुत आणि विविध विदया पारंगत असल्याने कीर्तन रसभरीत । बाबांच्या चेह-यावरील प्रन्नता बघून व हेच अनुमोदन आपल्या कीर्तन भजन उत्सव आनंदात पार. रामजन्माच्याया बाबांच्या डोळयात गुलाल आणि कौसल्यात श्रीराच्यारूप जणू काय बाबाच नरसिंह प्रकटले. गुलाचे निमित्त होते. रामजन्माचा तो आवेश होता. बाबांना एकाकी क्रोध आला. शिव्याशाप सुरू झाले. राधाकृष्णमाई पाण्याचे तुकडे होती म्हणून गड्बडून गेल्या. तो कसा सुरक्षित राहतो. “सोडा, सोडा, लवकर सोडा” असा त्यांचा लकडा लागल्या मूळ काका तो सोपाणा सोडायला सुराले. तो बाबा अत्यंत खवळले आणि काकांच्या अंगावर धावून गेले. मग पाळा सोडा























अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध
दैनिक राष्ट्र सह्याद्री
यशशिखरे
अहिल्यानगर | रविवार, दिनांक १९ एप्रिल २०२६



# अहिल्यानगर : महाराष्ट्राच्या विकासाचे 'इंजिन'



काकासाहेब उर्फ करण नवले
संपादक

**महाराष्ट्राच्या नकाशावरील भौगोलिकदृष्ट्या सर्वात मोठा जिल्हा म्हणून ओळखला जाणारा 'अहमदनगर' आता 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' या नावाने एका नव्या पर्वाची सुरुवात करत आहे. हा जिल्हा केवळ भूभागाच्या विस्ताराने मोठा नाही, तर सहकार चळवळ, कृषी क्रांती, शैक्षणिक प्रगती आणि ऐतिहासिक वारशानेही तितकाच समृद्ध आहे. संतांची भूमी, सहकाराचे माहेरघर आणि आधुनिक शेतीचा प्रयोगशील जिल्हा म्हणून अहिल्यानगरने राज्याच्या आणि देशाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे.**

### विकासाचा पाया

अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव घेताच डोळ्यासमोर येते ती म्हणजे 'सहकार चळवळ'. १९५० च्या दशकात पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरानगर येथे आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा दिली. हा केवळ एक कारखाना नव्हता, तर तो ग्रामीण विकासाचा एक 'नगर पॅटर्न' ठरला. यातूनच जिल्ह्यात साखर कारखान्यांचे जाळे विणले गेले, ज्याने शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणले. आजही साखर उद्योग हा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. सहकाराच्या माध्यमातून दूध संघ, बँका आणि पतसंस्थांचे जे जाळे जिल्ह्यात उभे राहिले, ते इतर जिल्ह्यांसाठी पथदर्शक ठरले आहे.

### प्रयोगशीलतेचा वारसा

जिल्ह्याचा मोठा भाग दुष्काळी असतानाही इथल्या शेतकऱ्यांनी आपल्या जिद्दीने शेतीत क्रांती घडवली आहे. उत्तर नगर जिल्ह्यातील बागायती पट्ट्याने देशाला साखर आणि फळे दिली, तर दक्षिण नगर जिल्ह्याने दुष्काळावर मात करत डाळिंब, पेरू आणि भाजीपाला उत्पादनात नाव कमावले आहे. राहुरी येथील 'महात्मा फुले कृषी विद्यापीठ' हे जिल्ह्याच्या कृषी प्रगतीचे केंद्रस्थान आहे. भंडारदरा आणि मुळा धरणांच्या सिंचनामुळे जिल्ह्याचा कायापालट झाला आहे. जलसंधारणाच्या कामात राळेगण सिद्धी आणि हिवरे बाजार या गावांनी जगाला आदर्श घालून दिला आहे. आदर्श गाव योजनेच्या माध्यमातून अण्णा हजारे आणि पोपटराव पवार यांनी पाणी बचतीचा आणि ग्रामीण विकासाचा जो मंत्र दिला, तो अहिल्यानगरच्या शिरपेचातील मानाचा तुरा आहे.

### ज्ञानाची गंगोत्री

अहिल्यानगर जिल्हा आज शिक्षणाचे एक मोठे केंद्र बनला आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व सोयी जिल्ह्यात उपलब्ध आहेत. संगमनेर, कोपरगाव, प्रवरानगर आणि नगर शहरात नामवंत अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालये आहेत. ग्रामीण भागातील मुलांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचावे, यासाठी सहकार क्षेत्रातील नेत्यांनी शैक्षणिक संस्थांचे मोठे जाळे उभे केले. 'अहमदनगर कॉलेज' सारख्या ऐतिहासिक शिक्षण संस्थेने जिल्ह्याला अनेक नामवंत व्यक्तिमत्त्वे दिली आहेत. आज या जिल्ह्यातून हजारो तरुण स्पर्धा परीक्षा आणि तांत्रिक क्षेत्रात आपली चुणूक दाखवत आहेत.

### ग्रामीण रुग्णांना दिलासा

आरोग्य क्षेत्रातही जिल्ह्याने मोठी झेप घेतली आहे. विखे पाटील मेडिकल कॉलेज आणि जिल्हा रुग्णालय ही आरोग्य व्यवस्थेचे महत्त्वाचे स्तंभ आहेत. दुर्गम भागातही प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आरोग्य सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिर्डी येथील 'साईनाथ रुग्णालय' हे केवळ जिल्ह्यासाठीच नाही, तर देशातील गरीब रुग्णांसाठी एक मोठे वरदान ठरले आहे. कमी खर्चात अत्याधुनिक उपचार देण्याची परंपरा इथल्या अनेक खाजगी आणि सेवाभावी संस्थांनी जपली आहे.

### उद्योग आणि पायाभूत सुविधा

जिल्ह्यात उद्योगांच्या बाबतीत नगर शहराचा एमआयडीसी परिसर आणि सुप्याचा औद्योगिक वसाहत अत्यंत महत्त्वाची आहे. अहमदनगर ही संरक्षण खात्याची आणि मोठी छावणी असल्याने शहराला एक वेगळी शिस्त आणि महत्त्व लाभले आहे. ऑटोमोबाईल आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात जिल्ह्याची प्रगती समाधानकारक आहे. समृद्धी महामार्ग आणि नवीन होणारे रेल्वे प्रकल्प यामुळे जिल्ह्याच्या दळणवळणाला गती मिळणार आहे, ज्यामुळे भविष्यात उद्योगांच्या विस्ताराला मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.



### कला, संस्कृती आणि पर्यटन

अहिल्यानगर जिल्हा हा अध्यात्म आणि पर्यटनाचा संगम आहे. जगाला श्रद्धेची शिकवण देणारे शिर्डीचे 'साई बाबा', शनि शिंगणापूरचा चमत्कार, राहुरीचे सिद्धेश्वर आणि नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराजांचे मंदिर यामुळे जिल्ह्याला पवित्र स्पर्श लाभला आहे. ज्ञानेश्वरीची रचना याच मातीत झाली, हे या जिल्ह्याचे सर्वात मोठे आध्यात्मिक संचित आहे. कलेच्या क्षेत्रातही जिल्ह्याने मोठे योगदान दिले असून, तमाशा आणि लोककला जोपासण्यात नगरचा मोठा वाटा आहे. येथील ऐतिहासिक अहमदनगर किल्ला, जिथे पंडित जवाहरलाल नेहरूंनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ग्रंथ लिहिला, तो आजही इतिहासाची साक्ष देत उभा आहे.

### आव्हाने आणि भविष्याची दिशा

विकासाच्या वाटेवर चालताना जिल्ह्यासमोर काही आव्हानेही आहेत. दक्षिण नगर जिल्ह्यातील कायमस्वरूपी दुष्काळ निवारण्यासाठी अपूर्ण असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करणे ही महत्त्वाची गरज आहे. तसेच, वाढत्या शहरीकरणामुळे नगर शहराचा पायाभूत विकास, वाहतुकीची समस्या आणि बेरोजगारी हे प्रश्न सोडवणे गरजेचे आहे. शेतीपूरक उद्योगांना अधिक चालना देऊन तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळवून देणे, हे येणाऱ्या काळातील मुख्य ध्येय असायला हवे.

अहिल्यानगर जिल्ह्याचा इतिहास संघर्षाचा असला, तरी त्याचे वर्तमान हे 'सहकारातून समृद्धी'कडे जाणारे आहे. अहिल्यादेवींच्या नावाने मिळालेली नवी ओळख जिल्ह्याला अधिक जबाबदारीची आणि न्यायाची जाणीव करून देत आहे. इथला कष्टकरी शेतकरी, प्रयोगशील तरुण आणि ध्येयवादी नेतृत्व यांच्या जोरावर अहिल्यानगर जिल्हा आगामी काळात महाराष्ट्राच्या विकासाचे प्रमुख इंजिन ठरेल, यात शंका नाही.

